**मे. लोकनेते सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखाना लि., सुंदरनगर, पो. तेलगांव, ता. धारुर, जि. बीड या उदयोगाच्या प्रस्तावित विस्तारीकरण ४५ किलो लिटर प्रतिदिन ते ९० किलो लिटर प्रतिदिन मळी / उसाच्या रसावर आधारीत आसवणी निर्मिती प्रकल्पा बाबत पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणीचा इतिवृत्तांत :**

..............................................................................................................................

मे. लोकनेते सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखाना लि., सुंदरनगर, पो. तेलगांव, ता. धारुर, जि. बीड या उदयोगाच्या प्रस्तावित विस्तारीकरण ४५ किलो लिटर प्रतिदिन ते ९० किलो लिटर प्रतिदिन मळी / उसाच्या रसावर आधारीत आसवणी निर्मिती प्रकल्पा बाबत पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी मा. निवासी उपजिल्हाधिकारी, बीड यांचे अध्यक्षतेखाली दि. १७ जुलै २०२० रोजी सकाळी ११-०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे आयोजित करण्यात आली होती. सदर नियोजित सुनावणी कोविड १९ लॉकडाऊनमुळे सिस्को वेबेक्स ॲपद्वारे घेण्यात आली.

मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई २९ / २०२० पत्र क्रं. बी.ओ. / जे.डी.(डब्ल्यूपीसी) / पीएच / बी- २००७१३ – एफटीएस – ००८३ दि. १३/०७/२०२० अन्वये, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती गठीत करण्यात येऊन खालीलप्रमाणे समितीचे अधिकारी सदर लोकसुनावणीस उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा. निवासी उपजिल्हाधिकारी, बीड | : | अध्यक्ष |
| २. | प्रादेशिक अधिकारी,<br>मप्रनि मंडळ, औरंगाबाद | : | सदस्य |
| ३. | उप-प्रादेशिक अधिकारी,<br>मप्रनि मंडळ, जालना | : | समन्वयक |

डॉ. योगिनी बाळंखे, उप-प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ जालना तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती यांनी सुरुवातीला सर्व उपस्थितांचे स्वागत करुन जनसुनावणी समिती अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी बाबतची प्रस्तावना थोडक्यात विषद केली.

भारत सरकार, पर्यावरण व वने मंत्रालय, नवी दिल्ली यांची अधिसुचना क्रं. एस.ओ.१५३३ दि. १४/०९/२००६ (दि. ०१/१२/२००९ सुधारित) नुसार सदर प्रस्तावासंबंधी पर्यावरण विषयक सुचना, विचार, टिका टिप्पणी आक्षेप नोंदविण्यासाठी जाहीर लोकसुनावणीचे आयोजन केले आहे.

पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी घेण्यासाठी रितसर अर्ज महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे दि. ०३/०३/२०२० रोजी प्राप्त झाला होता. त्याअनुषंगाने मा. जिल्हाधिकारी, बीड यांनी जिल्हयातील कोरोना व्हायरसचा प्रादूर्भाव लक्षात घेऊन सदर पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी सिस्को वेबेक्स वॉनलाईन ॲपद्वारे घेण्याबाबत आदेशित केले होते. त्याअनुषंगाने आजची जाहीर लोक सुनावणी सिस्को वेबेक्स वॉनलाईन ॲपद्वारे घेण्यात येत आहे. सदर बाबतची जाहीर सुचना दि. ०६/०६/२०२० रोजी दै. सकाळ (मराठी) व दी टाईम्स ऑफ इंडीया (इंग्रजी) या वृत्तपत्रांमध्ये प्रकाशित करण्यात आली होती. सदर परिसरामधील रहिवाशी, पर्यावरण विषयी काम करणा-या संस्था, विस्तापित होणारे किंवा अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवाशी यांना सुचना, टिका टिप्पणी लेखी स्वरुपात ३० दिवसांपर्यंत उप-प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, जालना येथे पाठविण्याचे नमुद करण्यात आले आहे. जाहीर लोकसुनावणी सिस्को वेबेक्स वॉनलाईन ॲपद्वारे घेण्या बाबतचे शुध्दीपत्रक दै. सकाळी (मराठी) व दी टाईम्स ऑफ इंडीया (इंग्रजी) या वृत्तपत्रांमध्ये दि. १६/०७/२०२० रोजी प्रकाशित करण्यात आले आहे.

सदर प्रकल्पाविषयी व पर्यावरण मुल्यांकन अहवालाच्या सारांशाची माहिती असलेले दस्तऐवज (मराठी व इंग्रजी) मध्ये खालील कार्यालयामध्ये उपलब्ध करुन देण्यात आले होते.

- जिल्हाधिकारी कार्यालय, बीड
- जिल्हा उदयोग केंद्र, बीड

- जिल्हा परिषद, बीड
- तहसिलदार, तहसिल कार्यालय धारुर.
- ग्रामपंचायत कार्यालय – तेलगांव बीके, कारी, गवांदरा, कोथिंबीरवाडी, कासारी, लोणावळा, सावंत वस्ती, चाटेगांव, भोपा, आनंदवाडी, लंबेडगांव, सुरणवाडी, कचरवाडी, कंधेरवाडी,
- उप-प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ जालना

* प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ, औरंगाबाद

* (मुख्यालय),महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ मुंबई

* पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई

* प्रादेशिक कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, पश्चिम मध्य विभाग, तळमजला, पुर्व विंग, नवीन सचिवालय इमारत, सिव्हील लाईन, नागपूर

उप-प्रादेशिक अधिकारी तथा समन्वयक, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती यांनी नमुद केले की, अदयाप पावेतो उप-प्रादेशिक कार्यालय, मप्रनि मंडळ जालना यांचेकडे कुठलेही आक्षेप, टिका टिप्पणी, तोंडी किंवा लेखी स्वरुपात प्राप्त झालेला नाही. कोणास कांही लेखी / तोंडी आक्षेप नोंदवायचे असतील तर ते सदर सुनावणी दरम्यान नोंदवू शकतात.

समन्वयक यांनी अध्यक्ष, जाहीर लोक सुनावणी समिती यांना सदर प्रकल्प धारकांस / त्यांचे प्रतिनिधीस सादरीकरण करण्याचे आदेश देण्याची विनंती केली.

मा. निवासी उपजिल्हाधिकारी, बीड व अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी यांनी प्रकल्पाचे प्रतिनिधी यांना प्रकल्पाबददल सादरीकरण करण्याचे आदेशित केले.

प्रकल्पाचे प्रतिनिधी यांनी प्रकल्पाबददल विविध मुदयांवर सादरीकरण केले जसे की,- पर्यावरण प्रभाव मुल्यांकन आणि जाहीर जनसुनावणीचे प्रयोजन, प्रकल्पाचा तपशिल, प्रकल्पाचा आराखडा, पर्यावरण सदयस्थितीचा अभ्यास, स्थानीक पर्यावरणाचा तपशील व परिसराची माहिती, अभ्यास स्थळाची माहिती, अध्ययन क्षेत्रातील हवेचा दर्जा, अध्ययन

क्षेत्रातील ध्वनीची तीव्रता, अध्ययन क्षेत्रातील पाण्याची गुणवत्ता, अध्ययन क्षेत्रातील मातीची गुणवत्ता, जैव पर्यावरण, सामाजिक आर्थीक पर्यावरण, सभोवतालच्या पर्यावरणावर होणारे अपेक्षित परिणाम, पर्यावरण व्यवस्थापन आराखडा, विविध पर्यावरण विषयक परिणामांच्या उपाय योजना, पर्यावरण जबाबदारी योजने अंतर्गत सामाजिक-आर्थीक कल्याण उपक्रम, पर्यावरण व्यवस्थापन खर्चाची तरतूद, प्रकल्पाचे फायदे इत्यादी.

सदर माहिती सीडीमध्ये रेकॉर्डींग करण्यात आली असून संक्षिप्तमध्ये इतिवृत्तांतात नोंद करण्यात आली आहे.

**प्रोसेडींग :**

| अ. क्रं. | टिका टिप्पणी, आक्षेप सुचना मुददा इत्यादी नोंदविणा-या व्यक्तिचे नांव व पत्ता | उदयोगाच्या प्रतिनिधीने दिलेले आश्वासन / उत्तर |
|---|---|---|
| १. | श्री. दिपक<br>रा. तेलगांव यांनी मुददा उपस्थित केला की, सदर प्रकल्पाचा तेलगांवला काय फायदा होईल. | उदयोगाच्या प्रतिनिधींनी उत्तर दिले की, सदर प्रकल्पामुळे उस उत्पादकांना चांगला भाव देणेस मदत होईल. |
| २. | श्री. अरुण दत्तात्रय मोरे<br>रा. कारी यांनी मुददा उपस्थित केला की, कारखान्यातून निघणा-या सांडपाण्याचा पिकावर काय परिणाम होईल? | उदयोगाच्या प्रतिनिधींनी उत्तर दिले की, कारखान्यावर प्रक्रिया करण्यासाठी अदयावत सयंत्रणा उभारण्यात येणार असल्यामुळे कारखान्यातून निर्माण होणारे पाणी झेडएलडी असेल. त्यामुळे पिकावर परिणाम होण्याचा प्रश्न येत नाही. |
| ३. | श्री. संजय लगड<br>रा. तेलगांव यांनी मुददा उपस्थित केला की, कारखान्यात तयार होणारे कंपोष्ट शेतक-यांना दिले जाईल काय? | उदयोगाच्या प्रतिनिधींनी उत्तर दिले की, कारखान्यात तयार होणारे कंपोष्ट शेतक-यांना व इतरांना देण्यात येईल. |
| ४. | श्री. गोपीनाथ जाधव<br>रा. बावी यांनी मुददा उपस्थित | उदयोगाच्या प्रतिनिधींनी उत्तर दिले की, पाणी, हवा व ध्वनी प्रदूषण नियंत्रणासाठी आवश्यक ती उपाय |

| | | |
|---|---|---|
| | केला की, सदर प्रकल्पामुळे आसपासच्या गांवास कांही धोका होईल काय? | योजना उभारण्यात येईल. |
| ५. | श्री. दादासाहेब धुमाळ<br>रा. तेलगांव यांनी मुददा उपस्थित केला की, सदर कारखान्यामार्फत हवेचे प्रदूषण रोखण्यासाठी काय यंत्रणा उभारण्यात येईल? | उदयोगाच्या प्रतिनिधींनी उत्तर दिले की, हवेचे प्रदूषण रोखण्यासाठी ८५ मीटर उंचीचे धुराडे इएसपीसह उभारण्यात येईल. |
| ६. | श्री. सत्तार शेख<br>रा. अकी यांनी मददा उपस्थित केला की, सदर प्रकल्पामुळे गांवातील लोकांना काय फायदा होईल? | उदयोगाच्या प्रतिनिधींनी उत्तर दिले की, गांवातील लोकांच्या उसास चांगला भाव मिळेल व रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. |
| ७. | श्री. मोरे<br>रा. कारी यांनी मुददा उपस्थित केला की, कारखान्यात निर्माण होणा-या सांडपाण्याची विल्हेवाट कशी करण्यात येईल? | उदयोगाच्या प्रतिनिधींनी उत्तर दिले की, कारखान्यात निर्माण होणा-या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी अदयावत झेडएलडी सयंत्रणा उभारण्यात येईल. |

लोकसुनावणी समितीचे सदस्य तथा प्रादेशिक अंधिकारी, मप्रनि मंडळ औरंगाबाद यांनी पर्यावरण संवर्धनासाठी कांही सुचना दिल्या जशा की,-

इसीचा पुर्तता अहवाल सादर करणे, स्पेंट वॉश किती जाळणार, कोळशामधील राखेचे प्रमाण ३५ टक्के जे विहित मर्यादेत नाही इत्यादी.

लोकसुनावणी समितीचे समन्वये तथा उप-प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ जालना यांनी पर्यावरण संवर्धनासाठी मोठया प्रमाणावर वृक्षारोपन करण्याचे आवाहन केले.

सदर जाहीर लोक सुनावणीचे अध्यक्ष तथा निवासी उपजिल्हाधिकारी, बीड यांनी नमूद केले की, अजुनही कोणाला कांही लेखी किंवा तोंडी सुचना / आक्षेप मांडावयाचे असतील तर ते मांडू शकतात. तथापि, कोणीही पुढे आले नाही. तदनंतर सदर सुनावणीचे समन्वयक यांनी सदर सुनावणीचा सारांश विषद केला व संबंधितांचे आभार मानले व सदर जाहीर लोक सुनावणीचे अध्यक्ष तथा निवासी उपजिल्हाधिकारी यांचे परवानगीने सदर सुनावणीचे कामकाज संपल्याचे जाहीर केले.

Byogini

**( डॉ. योगिनी बाळंखे)**
समन्वयक तथा उप प्रादेशिक अधिकारी, जालना

**( डॉ.प्र.म.जोशी )**
सदस्य तथा प्रादेशिक अधिकारी, औरंगाबाद

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

**( एम.के.सूकटे )**
अध्यक्ष
पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती
तथा
निवासी उपजिल्हाधिकारी, बीड